नि.दि.दा.क्र.४३/२०१४
अहमद वि शासन
नि.क्र. ६७

**MHOS120006012014**

## नि.क्र. ६७ च्या अर्जावरील तोंडी आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी नि.दि.दा.क्र. ४९/२०१७ मधील नि.क्र. १ ची सत्यप्रत, हिस्सा फॉर्म क्र. ४ ची नक्कल, भुपामन क्र. १०६ चा पोट हिस्सा नकाशा नक्कल, ग्रामसेवक चुंबळी यांनी दिलेले पत्र, सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत चुंबळी यांना दिलेला अर्ज आणि नि.दि.दा.क्र. ५४/२०१४ मनाई अर्ज नक्कल ही कागदपत्रे दाखल करणेकरीता सादर केलेला आहे. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जास जोरदार हरकत घेण्यात आली.

२. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेख पाहिले. दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतचे प्रकरण हे मनाई मिळणेबाबत दाखल केले आहे. प्रस्तावित दस्तऐवजांचे स्वरुप पाहता सदरचा दावा निकाली काढण्याकरिता नमुद दस्तऐवज आवश्यक आहेत. वादीतर्फे हिस्सा फॉर्म क्र. ४ ची नक्कल आणि ग्रामसेवक चुंबळी यांनी दिलेले पत्र अभिलेखावर दाखल केलेला आहे. म्हणून सदरील हिस्सा फॉर्म क्र. ४ ची नक्कल आणि ग्रामसेवक चुंबळी यांनी दिलेले पत्र हे दस्तऐवज दाखल करण्यास व निशाणी क्रमांक देण्यास परवानगी देण्यात येते. तसेच वादीतर्फे दाखल नि.दि.दा.क्र. ४९/२०१७ मधील नि.क्र. १ ची सत्यप्रत, भुपामन क्र. १०६ चा पोट हिस्सा नकाशा नक्कल, सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत चुंबळी यांना दिलेला अर्ज आणि नि.दि.दा.क्र. ५४/२०१४ मनाई अर्ज या कागदपत्रास फक्त दाखल करण्याची परवानगी देण्यात येते. अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो. पक्षकारांनी नोंद घेण्यात यावी.

Digitally signed by Irshad Mohmad Rafik Naikwadi
Date: 2021.03.04 11:20:55 +0530

ठिकाण –भूम. (ई. मो. नाईकवाडी),

दिनांक ०३.०३.२०२१ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,भूम.